# बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा

## राष्ट्रीय सेवा योजना

### नियमित कार्यक्रमाचे फोटो २०२२–२३

(सेंद्रीय शेती आजची गरज या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री.अरविंद जिड्डीवार)







(मा.अण्णासाहेब देशमुख पारवेकर 'हर घर तिरंगा' कार्यक्रमात सहभाग)

# शिबीराचे फोटो २०२२–२३



(भाषिक सर्वे करताना टिपेश्वर गावातील नागरिक व विद्यार्थी )



भाषिक सर्वे करताना टिपेश्वर गावातील नागरिक व विद्यार्थी )



पक्षांसाठी पाणपोई लावतांना विद्यार्थी आणि मा. प्राचार्य )

## नियमित कार्यक्रमाचे फोटो २०२३–२४



(पंचं प्रण शपथ घेतांना जि.प.शाळा टिपेश्वर येथील विद्यार्थी व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.लोहवे)




हर घर तिरंगा' कार्यक्रमात तिरंगा जाणीवेसाठी रॅली काढताना प्राध्यापक व विद्यार्थी)



हर घर तिरंगा' कार्यक्रमात तिरंगा जाणीवेसाठी रॅली काढताना प्राध्यापक व विद्यार्थी)



वृक्षारोपन करताना गावकरी, सचिव व विद्यार्थी)



७५ वृक्षांच्या रोपवाटीकेमध्ये  विद्यार्थी)










मेरी माटी मेरा देश कार्यक्रमात माटी गोळा करताना विद्यार्थी)

पुण्य नगरी

# सागर खटाळे याची निवड



पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

**घाटंजी :** तालुक्यातील पारवा येथील बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयाचा बी. ए. भाग-१चा विद्यार्थी सागर मनोहर खटाळे याची नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत शिबिरासाठी निवड झाली आहे.

सागर खटाळे हा आपत्ती व्यवस्थापनामध्ये अनेक ठिकाणी ट्रेनिंग देत असतो. आपत्ती व्यवस्थापनाचा एक कार्यकर्ता म्हणून त्याची ख्याती आहे. सदर शिबिर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक असलेल्या सागर खटाळे याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गजानन लोहवे यांच्यासह प्रा. लक्ष्मण यादव, प्रा. डॉ. जगदीश हेंडवे, डॉ. संदीप अग्रवाल, प्रा. डॉ. संदीप देसाई आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

Smart Yavatmal Edition
Jan 1, 2024 Page No. 02
Powered by : eReleGo.com

## शिबीराचे फोटो २३–२४







संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर
दि. २२ फेब्रुवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४
स्थळ : दिपेश्वर ता. घाटंजी जि. यवतमाळ
पारवा शिक्षण संस्था, पारवा द्वारा संचालीत व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नीत.
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा
तमसो मा ज्योतिर्गमय
पारवा जि. यवतमाळ

# पारवेकर महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

**विदर्भ कल्याण / घाटंजी**

पारवा शिक्षण संस्था संचालित बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले.

पारव्या जवळील टिपेश्वर पुनर्वसित या दत्तक ग्रामात हे श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तथा माजी मुख्याध्यापक अनिस खान उद्घाटक म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे स्थानापन्न होते. विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार रुजावा, समप्रतिष्ठा वाढावी, समाजातील समस्या कळाव्यात आणि




सामाजिक आंतरसंबंध निर्माण व्हावेत अशा अनेक गोष्टींसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर घेतल्या जाते. या शिबिरामध्ये अनेक मान्यवरांचे उद्बोधन तर होईलच शिवाय श्रमदानही केल्या जाईल. वृक्षारोपण करणे, ग्रामसफाई, ग्रामस्थांसोबत संवाद, त्यांच्या समस्या जाणून घेणे अशा अनेक गोष्टी या शिबिरामध्ये अंतर्भूत आहे.

अनिस खान आपल्या उद्घाटकीय भाषणामध्ये म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विचारपीठ निर्माण करणारी प्रयोगशाळा आहे. श्र

माचे संस्कार करणारे एक विद्यापीठ आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने शिबिरामध्ये आपला सहभाग नोंदविला पाहिजे." असेही त्यांनी कळकळीचे आवाहन केले. अध्यक्ष डॉ. धर्मेंद्र तेलगोटे म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजनेतूनच माणूस घडतो. माणूस घडवणारी ही कार्यशाळा आहे." असाही त्यांनी मौलिक विचार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गजानन लोहवे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रमाधिकारी डॉ. संदीप अग्रवाल यांनी व्यक्त केले. विचार पिठावर टिपेश्वर येथील सुभाष येडमे उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसोबत गावकरीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रा. डॉ. हेंडवे, प्रा। यादव, प्रा. डॉ. चांदेकर, प्रा. डॉ. देसाई आणि शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा उपस्थित होते. संतश्रेष्ठ गाडगेबाबांच्या प्रतिमेच्या पूजनाने सुरुवात झाल्यानंतर राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# टिपेश्वर पुनर्वसित येथे रासेयो शिबिरामध्ये वृक्षदिंडी



**विदर्भ कल्याण / घाटंजी**

पारवा येथील बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर टिपेश्वर पुनर्वसित येथे संपन्न झाले. या शिबिरामध्ये वृक्षारोपण करून सृष्टी हिरवीगार करणे हेच एक ध्येय ठेवले होते. दिनांक 22 फेब्रुवारी ते 29 फेब्रुवारी या दरम्यान हे शिबिर संपन्न झाले. यामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

टिपेश्वर गावाच्या मधोमध असलेल्या पटांगणामध्ये 15 ते 20 फुटाचे कडुलिंबाचे वृक्ष लावण्यात आले. याशिवाय टिपेश्वर गावातील प्रत्येक घरामध्ये पेरूचे किंवा चिक्कूचे एक एक वृक्ष महाविद्यालयाकडून भेट देण्यात आले. प्राचार्य डॉ. तेलगोटे सरांच्या संकल्पनेतून गावांमधून वृक्षदिंडी काढण्यात आली. काही कडुलिंबाचे आणि चिक्कू, पेरू असे झाड एकत्र करून ही वृक्षदिंडी गावमधून फिरवण्यात आली आणि जनजागरण करण्यात आले. या वृक्ष दिंडीमध्ये गावातील महिला, पुरुष तर मोठ्या संख्येने उपस्थित होतेच शिवाय जिल्हा परिषद शाळा टिपेश्वर येथील विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला होता. जल, जमीन, जंगल याविषयी जनजागृती करणारे गाणे म्हणत, पारंपारिक वाद्यांच्या तालावर नाचत एक आनंद व्यक्त करत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करीत ही वृक्षदिंडी काढण्यात आली.

गावकऱ्यांसाठी हा वृक्षदिंडीचा प्रयोग आगळा-वेगळा होता, पण वृक्षांच्या जतनाचा संस्कार करणार होता. त्यामुळे गावकऱ्यांनी या कार्यक्रमाबद्दल अतिव समाधान व्यक्त केले. ही वृक्षदिंडी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे सर यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन लोहवे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. अग्रवाल यांनी राबविला.

या वृक्ष दिंडीमध्ये महाविद्यालयातील प्रा. लक्ष्मण यादव, डॉ.हेंडवे, डॉ. चांदेकर, डॉ. देसाई आणि शिक्षकेतर कर्मचारी व गावकरीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. वृक्ष रोपणा संदर्भात वृक्ष जतन, वृक्ष संवर्धनासंदर्भात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात घोषणाही दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात गावातीलच एका ज्येष्ठ व्यक्तीने नारळ फोडून केली तर वृक्ष कसे लावायचे यासंदर्भात माहिती सांगून कार्यक्रमाची सांगता आणि गावकऱ्यांचे आभार प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी व्यक्त केले.